INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# गोवामुक्ती आंदोलनातील महिलांचे योगदान

# (Contribution of Women's in Goa Liberation Movement)

**प्रा.डॉ. बी. डी. जाधवर**

इतिहास विभाग प्रमुख

बलभीम महाविद्यालय, बीड

E-mail: bapujadhavar16@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/12.2021-64442868/IRJHIS2112005**

**प्रस्तावना :**

भारतीय इतिहासाच्या तिन्ही कालखंडाचे अवलोकन केल्यानंतर असे स्पष्ट होते की, प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक या तिन्ही कालखंडात अनेक राजकीय, सामाजिक, धार्मीक, आर्थिक, सांस्कृतिक, घडमोडी घडून गेलेल्या दिसतात. त्यामध्ये प्रामुख्याने भारतावर झालेली पाश्चिमात्यांची अनेक आक्रमणे त्यांनी देशाच्या विविध भागावर वर्चस्व प्रस्थापत करून स्थानिक नागरीकांचे केलेले आर्थिक शोषण मग या प्रक्रीयेत सर्वच पाश्चिमात्यांचा संदर्भ येतो. या संदर्भाच्या पूर्वी प्राचीन भारतातील घटनांचा आढावा घेतला तर अनेक ठिकाणी संघर्ष झाल्याच्या नोंदी इतिहासाने घेतलेल्या आहेत. मग त्या नोंदीमध्ये स्त्रीयांच्या आंदोलनाची दखल घेतलेली आहे. म्हणजे प्राचीन कालखंडात सुध्दा अनेक स्त्रीयांनी अन्याय आणि अत्याचारी राजवटीस विरोध केलेला होता. वरिल कालखंडानंतर मध्ययुगीन काळाचा विचार करता सुलतान आणि मोघल या सत्ताधीशांनी इ.स. १२०६ ते १५२६ पर्यंत या देशावर सत्ता प्रस्थापित केली आणि अनेक भारतीयांचा छळ केला. परंतू त्यांच्या वरील धोरणास विरोध करण्यासाठी जे संघर्ष घडून आले. त्यामध्ये अनेक स्त्रीयापण सहभागी होत्या.

प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडातील घटनामध्ये भारतीय स्त्रीयांच्या योगदानाची अगदी थोडक्यात चिकित्सा केल्यानंतर आधुनिक कालखंडाकडे दृष्टीक्षेप करणे क्रमप्राप्त आहे. कारण याच कालखंडात भारतीय नागरीकांना स्वतंत्रपणे जिवन जगण्याचे अधिकार किंवा हक्क प्राप्त झाले होते. परंतू त्यासाठी तत्कालीन महिला आणि पुरुषांना फार मोठी किंमत मोजावी लागली होती. अशी घटना काय होती असा प्रश्न झाला तर त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपणास आधुनिक भारताच्या इतिहासाचे अध्यायन करावे लागते. कित्येक वर्षापूर्वी या देशात काही पाश्चिमात्यांनी आपले स्थान अगदी भक्कम करून काही भागावर आपली सत्ता स्थापन करून त्या परिसराचा मी एक स्वतंत्र राजा आहे. अशा स्थितीत ते वावरत होते. एकंदर ही स्थिती भारताच्या अनेक प्रांतात होती. परंतू त्यावर मात करण्यासाठी जी आंदोलने झाली. त्या आंदोलनात महिलांचा सुध्दा सिंहाचा वाटा आहे, हे इतिहासाच्या अभ्यासाने आपणास माहिती मिळते. भारतावर अनेक पाश्चिमात्यांनी आपली सत्ता प्रस्थापित केलेली होती आणि भारतीय भूमी ही आपली हक्काची मालमत्ता आहे, अशी त्यांची धारणा होती. या देशात सर्व प्रथम येणारे आणि सर्वांच्या शेवटी या देशाची भूमी सोडून जाणारे जर कोण असतील तर पोर्तुगीज होय. पोर्तुगीजांच्या गोवा येथील राजवटीच्या विरोधात किंवा गोवामुक्ती साठी जो लढा उभारला होता. त्या लढ्यामध्ये अनेक

महिला सहभागी झालेल्या होत्या. त्यांच्या कार्याचा आणि अशा महिला कोण होत्या.याचा उहापोह या शोध निषेधात मी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गोवा हे आज स्वतंत्र घटक राज्य आहे. परंतू पूर्वी मात्र ते स्वतंत्र घटक राज्य नव्हते. या विषयी थोडी माहिती येथे नमूद करणार आहे. गोवा या प्रातांचा उल्लेख स्कंदपुराणाती सह्याद्री खंडात गोमंत असा आढळतो. तर सुत संहितेत गोवापुरी असा उल्लेख आहे. प्राचीन कालखंडामध्ये ज्या प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणावर गोधन होते. त्या भागास गोवा असे नाव पडले हे गोव्याविषयी म्हटले जाते. इ.स.पू. दुसऱ्या व तिसऱ्या शतकात या प्रदेशावर मौर्यांची तर चौथ्या शतकात देवराज राजाची राजवट होती. याशिवाय कदंब, चालक्य, राष्ट्रकुट यादव याची पण सत्ता यादवानी गोवा येथे एकशे एक वर्षे सत्ता प्रस्थापित केली होती. याशिवाय मलीक कफुर, महंमद तुघलक, बहामनीचा वजीर महमंद गवान, विजापूरची आदिलशाही, यांचे साम्राज्य होते. परंतू १६ फेब्रुवारी १५१० मध्ये पोर्तुगीज सरदार अल्बुर्कक याने गोवा जिंकून तेथे आपला एकक्षेत्री अंमल प्रस्थापित केला. एकंदर त्यांच्या धोरणास विरोध व गोवा मुक्तीसाद्वीजो संघर्ष सुरु झाला. त्यामध्ये देशातील अनेक स्त्रीयांनी योगदान दिलेले होते. त्याचे विवेचन आपणास खालील प्रमाणे करता येईल.

**गोवा मुक्तीसाठी लोहियांचा संघर्ष व स्त्रियांचा सहभाग :**

इ.स. १५१० ते इ.स. १९६१ या कालखंडात गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यात होता हे सर्व प्रथम येथे नमूद करणे क्रमप्राप्त ठरते. इ.स. १९२६ मध्ये डॉ.ए.ए. सालाझारची पोर्तुगालमध्ये हुकूमशाही राजवट सुरु झाली. तो अतिशय धर्मवेडा होता. त्याच्या वरील धोरणाचे पडसाद गोवा येथील पोर्तुगीज वसाहतीवर पडू लागले. त्याने मुद्रण स्वातंत्र्य आणि वसहातिच्या अधिकारावर निर्बंध आणले. परवानगी विना सभा घेवू नये आणि घेतली तर तो गुन्हा ठरेल असे स्पष्ट केले. त्या विरोधात गोवा येथील काही तरूण एकत्र व विरोध करण्यास प्रारंभ. या मोहिमेचे नेतृत्व डॉ. मिनेझीस यांनी स्विरले. त्यांच्या मदतीला डॉ. राम मनोहर लोहीया हे १० जुन १९४७ रोजी पुढे आले. त्यांनी स्थानिक तरूणांची मते जाणून घेवून गोवा मुक्ती लढ्याचे रणशिंग फुंकले गेले.

**लोहीयांचे सत्तास्थानी आगमन व अटक :**

गोवा मुक्तीसाठी आंदोलनाचे रणशिंग फुंकून १८ जुन १९४६ रोजी मडगाव येथे सत्याग्रह करण्याचा दिवस निश्चित करण्यात आला. संध्याकाळी मडगावच्या मैदानावर पाच वाजता लोहीयांचा सत्याग्रह होणार होता. परंतू यास पोर्तुगीज पोलीसांचा विरोध होता. पोलीस डोळ्यात तेल घालून चर्चच्या मैदानावर राम मनोहर लोहीया पोहचणार नाहीत. याची काळजी घेत होते. परंतू त्यांची नजर चुकवून लोहीया सभास्थळी आले ते येता वेळेस बंदघोडा गाडीमधून आले होते. जेंव्हा ते घोडागाडीतून खाली उतरले. त्या क्षणालाच पोलीसांनी त्यांना अटक केली. राम मनोहर लोहिया यांच्या समवेत वत्सला कीर्तने ही महीला सहभागी होती. तिने वरील घटनेचा निषेध म्हणून जोर जोराने घोषणा देण्यास सुरु केली. तेंव्हा पोर्तुगीज पोलीसांनी त्यांना पण अटक केली. परंतू कीर्तनेच्या सुटकेसाठी मडगावातील स्त्रियांनी एकत्र येवून मोर्चा काढला. त्यामध्ये जवळपास साठ स्त्रिया सहभागी झालेल्या होत्या. तो मोर्चा, पोलीस चौकीवर नेला. परंतू स्त्रियांच्या शक्तीपुढे पोलीसांना माघार घेणे भाग पडले. त्यांनी कीर्तनेची सुटका केली. त्यामुळे त्याने गोवा मुक्ती आंदोलनाला प्रोत्साहान दिले.

**गोवा मुक्ती आंदोलन आणि पोलीसांची भूमीका :**

पोर्तुगालच्या तावडीमधून गोवामुक्त करण्यासाठी अनेक नागरीकांनी मुक्ती आंदोलनात सहभाग घेतलेला होता. अशा आंदोलकावर पोलीसांनी विविध कलमांच्या आधारे गुन्हे दाखल करून दडपशाही सुरु केलेली होती. आंदोलकांनी जयहिंदचा नारा दिला तर त्यांच्यावर अमानुष अत्याचार केले जात असत. तरी पण आंदोलनाचे नेतृत्व स्विकारलेल्या त्रिशतांब बागांस आणि कुन्हा या दोघांनी पोलीसांच्या दडपशाहीला न घाबरता आंदोलकांच्या पाठबळावर आंदोलन चालुच ठेवले होते. त्यामुळे वरील दोघांना १२ जुलै १९४६ रोजी अटक करून त्यांच्यावर खटला भरला नंतर वरील दोघा आंदोलकांना आठ वर्षाची शिक्षा ठोठावली होती. वरील घटनेचा स्थानिक

नागरीकांनी निषेध करून विविध मिरवणूका काढल्या. यामध्ये स्त्रियांबरोबर अनेक बालकेही सहभागी झालेली होती. त्यामुळे गोव्यातील वातावरण अगदी ढवळून निघाले होते.

**गोवा मुक्ती संग्रामात सिंधुताई देशपांडेचे योगदान :**

गोवामुक्ती संग्रामाला जनमताचा पाठिंबा मिळाला पाहिजे या हेतूने सिंधूताई देशपांडे यांनी स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करून या आंदोलनात स्त्रियांचा सहभाग वाढवण्यास प्रारंभ केला. याशिवाय सिंधूताई देशपांडे यांनी २५ नोव्हेंबर १९५४ रोजी पणजी येथे महिलांना समवेत घेवून त्यांनी सत्याग्रह केला. तेंव्हा पोलीस प्रशासनाने त्यांना अटक करून गोव्याच्या बाहेर सोडले होते. तरी पण त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. त्यांनी गोवामुक्त करणे हेच माझे स्वप्न आहे, अशी घोषण करून पर्वती येथे एका शिबीराचे आयोजन केले. या शिबीराच्या व्यासपीठावरून बोलताना त्यांनी असे घोषित केले की, हे आंदोलन स्त्रि-पुरूषांनी एकत्र येऊन सुरू करावे ही चळवळ फक्त पुरूषांचीच नाही तर स्त्रि-पुरुष चळवळ आहे, असे मत मांडले परंतू त्यांची ही मागणी आंदोलनकर्त्या नेत्यांना शक्य वाटली नाही. कारण कधीच घराबाहेर न पडणाऱ्या स्त्रीया आंदोलनात सहभागी होऊन पोलीसी अत्याचार कसा सहन करणार हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता.

२५ नोव्हेंबर १९५४ रोजी सिंधूताई देशपांडे यांनी पणजी येथे केलेल्या सत्यागृहामुळे त्यांना अटक करून गोव्याबाहेर पाठवून त्यांना गोवा बंदीचे आदेश दिले होते. परंतू त्यांनी या आदेशाचा विचार न करता व बंदी हुकूम न पाळता पोलीसांची नजर चुकवण्यासाठी काही पर्याय शोधले होते. त्यांनी असे घोषीत केले की, मी गजानन रायकर यांची विधवा बहीण असून मंगेशाच्या दर्शनाला जाणार आहे असे सांगितले व पोलीसांना चुकीची माहिती देवून त्यांनी गोव्यात प्रवेश केला. त्यांनी गोव्यातील अनेक ठिकाणी बैठका घेवून महिला जागृती करण्यास सुरुवात केली. त्यांच्या या कार्याला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत गेला. अनेक मुली आणि स्त्रिया या संग्रामात सहभागी झाल्या. त्यांच्यावर सिंधुताईने अनेक जबाबदाऱ्या सोपवून त्यांना मुक्ती आंदोलनासाठी प्रेरित केले. त्यामध्ये प्रामुख्याने कु. शांता हेडे, शशिकला होडकर विलासीनी प्रभू देसाई, कुमूदिनी पैंजणकर या स्त्रियांच्या नावाचा उल्लेख करावा लागेल.

**अविस्मरणीय कार्य दिन आणि आंदोलकांची भूमिका :**

इ.स. २५ नोव्हेंबर १५१० मध्ये गोवा येथे अल्बुर्कक या पोर्तुगीज व्यक्तीने सत्ता स्थापन करून गोव्याचा कारभार करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे पोर्तुगीजांच्या दृष्टीने २५ नोव्हेंबर हा दिवस विजय दिन म्हणून ते साजरा करत असत. प्रत्येक वर्षी हा दिवस गोव्यात अगदी धुमधडक्यात साजरा होत असे. परंतू याच दिवसी पोर्तुगीजांना आंदोलकांनी धक्का देण्याचा निर्णय घेतला. अविस्मरणीय कार्यदिन म्हणून त्यांनी २५ नोव्हेंबर १९५४ हा दिवस निश्चित केलेला होता. या समारंभाची गोव्यात जय्यत तयारी झालेली होती. तत्कालीन गोव्याचे गर्व्हनर बर्नाडा गर्दिझ यांच्या हस्ते या समारंभाचे ध्वजारोहन होणार होते. पूर्ण तयारी होऊन काही क्षणात गव्हर्नर समारंभस्थळी येणार याच काळात सिंधूताईनी तेथे प्रवेश करत हातात तिरंगा ध्वज घेऊन त्यांनी जयहिंदच्या घोषणा देण्यास सुरूवात केली. पोर्तुगीजानी सिंधूताईच्या आक्रमकतेकडे पाहून ते अस्वस्थ झाले. गव्हर्नर गर्दिझ घाबरून ध्वजारोहन न करताच तेथून निघून गेले. त्यांनी मानवंदनेचा स्विकार ही केला नाही. सिंधूताईनी जे कार्य केले त्यामुळे पोर्तुगीजांच्या विजयी दिनाचे पराजय दिनात रुपांतर झाले. आणि गोवा मुक्त आंदोलनाला गती प्राप्त होऊन १८ डिसेंबर १९६१ रोजी गोवामुक्त झाला. वरील सर्व घडामोडी झाल्या. परंतू सिंधूताई देशपांडेंना गोवामुक्तीची क्रांती देवता असे म्हटले असले तरी त्यांना १२ डिसेंबर १९५५ रोजी बारा वर्षाची तुरूंगवासाची शिक्षा झाली.

**सुधाताई जोशी :**

पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या सुधाताई जोशी या पत्नी होत्या. पंडीत जोशी हे मराठवाड्यातील प्रख्यात मराठीतील कथाकार होते. त्यांनी कॉंग्रेसच्या पुण्यातील बैठकीत मुक्ती आंदोलन तिव्र करण्याची इच्छा व्यक्त केली होती. परंतू त्यांच्यावर शस्त्रक्रीया

झाल्यामुळे त्यांची प्रकृती ठिक नव्हती. अशा काळात त्यांना गोव्याला जाऊ देणे योग्य नव्हते. त्यांना पोर्तुगीज पोलीसांचे अत्याचार सहन न होणारे होते. तेंव्हा पतीचे अपूरे कार्य पूर्ण करण्याचा निर्धार सुधाताई जोशी यांनी बोलून दाखवला. यास महादेवशास्त्रींनी जड अंतःकरणाने मान्यता दिली. तेंव्हा ६ एप्रिल १९५५ रोजी त्या गोव्यामध्ये होणाऱ्या नॅशनल कॉंग्रेसच्या बैठकीत सहभागी झाल्या.

पंडीत महादेवशास्त्री जोशी यांनी सुधाताईना गोव्याला जाण्यास परवानगी दिल्यानंतर ५ एप्रिल १९५५ रोजी गोव्याकडे त्यांनी प्रयाण केले. पोलीसांची नजर चुकवत खुष्कीच्या मार्गाने त्यांनी प्रवास सुरु केला आणि गोव्यातील भोंडगेश्वर मंदिराजवळ दाखल झाल्या. ६ एप्रिल १९५५ या दिवशी हानुमान जयंती होती. दर्शनासाठी म्हणून त्या पहाटेच मारूती मंदिरात पोहचल्या पोलीसांची नजर चुकवून त्या गर्दीत मिसळल्या आणि ठरलेल्या वेळेनुसार त्या मैदानात जाऊन स्टुलवर उभारून त्यांनी अध्यक्षीय भाषण सुरु केले. लागलीस पोलीसांनी त्यांना अटक करून तुरूंगात टाकले. पुढे त्यांना बारा वर्षाची लष्करी न्यायालयाने शिक्षा ठोठावली.

**संदर्भ सूची :**

१. साने पी.एस., स्त्री जिवन, मौज प्रकाशन, मुंबई - १९६७.
२. भागवत कमल, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रकाशन पुणे- १९८५.
३. डॉ. बाबर सरोजीन, स्त्रि शिक्षणची वाटचाल, महाराष्ट्र राज्य शिक्षण- १९६८.
४. डॉ. कठारे अनिल, भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास एज्युकेशन पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रीब्युटर्स औरंगाबाद.
५. साखरे सिमा, स्त्रीवादी चळवळीच्या प्रणेत्या ताराबाई शिंदे, सीमा प्रकाशन, नागपूर.